जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

वरुड | मंगळवार

२४.०३.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: ५२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### 'खरात सारख्या विकृताला कठोरातील कठोर शिक्षा व्हावी'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई :-** नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात याच्या सांगण्यावरून तंत्र-मंत्रासाठी बोटाला जखम करून घेतल्याचा आरोप फेटाळून लावत, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी विरोधकांचे दावे खोडून काढले आहेत. 'माझ्या बोटाला झालेली जखम ही लोकसभा निवडणुकीच्या वेळी झालेली असून, खरातसारख्या विकृताला कायद्याने कठोर अद्दल घडवावी हीच आमची भूमिका आहे,' अशा शब्दांत तटकरे यांनी आपली बाजू स्पष्ट केली. अशोक खरात प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि सुनील तटकरे यांच्या नावाचा संबंध जोडून विरोधकांनी टीका केली होती.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एसटीच्या 'राजमाता जिजाऊ' बसचे लोकार्पण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - ढोल-ताशांच्या गजरात, लेझीमच्या लयबद्ध तालावर 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बस सेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

या दिमाखदार सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांसह विधीमंडळ सदस्य, वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. 'राजमाता जिजाऊ' हे नाव उच्चारताच मातृत्व, संस्कार आणि स्वराज्याची प्रेरणा मनात जागृत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणाऱ्या राजमाता



जिजाऊंच्या कर्तृत्वाला अभिवादन म्हणून ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेच्या माध्यमातून केवळ प्रवास नव्हे, तर इतिहासाची प्रेरणादायी परंपरा प्रत्येक प्रवाशाच्या मनात रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशा सुमारे ३००० बसचा ताफा टप्प्याटप्प्याने राज्यभर धावणार असून, सुरक्षितता, आराम आणि विश्वास यांचे त्रिवेणी संगम प्रवाशांना अनुभवता येणार आहे. 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' या गौरवशाली सेवांच्या परंपरेत 'राजमाता जिजाऊ' ही आणखी एक तेजस्वी कडी ठरणार आहे.


पूजन, फीत कापून झालेल्या शुभारंभानंतर मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री पवार आणि परिवहन मंत्री सरनाईक यांनी या बसमधून प्रवास केला. बसच्या अग्रभागी घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊंचा देखावा जणू इतिहासाला सजीव करत होताङ्कत्या दृश्याने संपूर्ण सोहळ्याला एक अद्भुत, प्रेरणादायी आणि ऐतिहासिक आयाम प्राप्त झाला.

## फडणवीस दाभोलकरांचा वारसा पुढे नेतायत!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकारण बाजूला ठेवून घेतलेल्या भूमिकेचे मी स्वागत करते. अशोक खरात याच्यासारख्या विकृत माणसाला देवेंद्र फडणवीस पाठीशी घालणार नाहीत. नरेंद्र दाभोलकर यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे त्यांची हत्या झाली. आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दाभोलकरांचा वारसा पुढे नेत आहेत. त्यासाठी मी देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर आभार मानते, असे वक्तव्य शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केले. त्या मंगळवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.

### अशोक खरात प्रकरणात सुप्रिया सुळेंनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार



अशोक खरात प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामी प्रतिमेला काळिमा फासला गेला आहे. संसदेतील खासदार मला एकच प्रश्न विचारत आहेत की, महाराष्ट्रात काय घडते आहे? आम्ही कमी पडलो, त्यामुळे महिलांना अशा ठिकाणी जाण्याची वेळ येते. समाज म्हणून आमची काहीतरी जबाबदारी आहे. अनेक वेळा लोक आम्हाला भेटतात , ते आमच्यासोबत फोटो काढतात. मला अशोक खरात प्रकरणात कोणाला वाचवायचे नाही. मात्र, त्याच्यासोबत फोटो काढणाऱ्या नेत्यांनाही याबद्दल माहिती नसेल. पण इथून पुढे कोणासोबतही फोटो काढताना आम्हाला विचार करावा लागेल. अशोक खरात याच्याबाबत अगोदरपासून माहिती असती तर असे गलिच्छ काम करणाऱ्याला पाठिशी घातले गेले नसते, असा माझा विश्वास असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. यावेळी सुप्रिया सुळे यांनी सध्या अशोक खरात प्रकरणामुळे संकटात सापडलेल्या रुपाली चाकणकर यांच्याबाबतही भाष्य केले.

याबाबत त्यांच्या पक्षाला प्रश्न विचारला पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसचे रोपटे शरद पवार यांच्याकडून हिसकावून घेण्यात आले. पवार आणि ठाकरे यांचे पक्ष फोडण्यात आले. त्यांनी शून्यातून पक्ष निर्माण केला ही त्यांची चूक होती का?, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.

## मुलताई-छिंदवाडा मार्गावर भीषण अपघातात तिघांचा अंत

### मुलताई मार्गावर ट्रक आणि पिकअपची धडक





(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**हिवरखेड** - मुलताई-छिंदवाडा महामार्गावर सोमवारी दुपारी झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात हिवरखेड येथील दोन उमद्या तरुणांसह ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला.

घाटपिंपरी जवळ मालवाहू वाहन आणि ट्रक यांच्यात झालेल्या या समोरासमोर धडकेने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून, हिवरखेड गावावर शोककळा पसरली आहे. ऐन उमेदीच्या काळात दोन तरुणांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने चावके आणि तडस कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिवरखेड येथील ज्ञानेश्वरराव चावके (वय २२) प्रज्वल आणि भूषण मधुकरराव तडस (वय २९) हे दोघे आपल्या मालवाहू वाहनाने मुलताईहून छिंदवाड्याकडे जात होते. घाटपिंपरीपासून काही अंतरावर समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती



की, पिकअप वाहनाचाअक्षरशः चक्काचूर अवघ्या बावीस आणि एकोणतीस वर्षांच्या दोन कर्तबगार तरुणांचा अपघाती मृत्यू झाल्याने संपूर्ण हिवरखेड परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. यामुळे ग्रामिण भागातील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## बच्चू कडूंनी सरकारी कार्यालयावर फेकले कांदे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** - प्रहार जनशक्ती पक्षाचा शेतकरी जन आक्रोश मोर्चा नाशिक जिल्ह्यातील येवला येथे जाऊन धडकला आहे.

तेव्हा, येवला प्रांताधिकारी कार्यालयात बच्चू कडू संतापल्याचं दिसून आलं. वीज वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यासह अधिकाऱ्यांना त्यांनी धारेवर धरले, देवरगाव येथील विजेच्या प्रश्नावर बच्चू कडू चांगलेच संतापले होते. येवल्यात प्रांताधिकारी कार्यालय आवारात शेतकऱ्यांनी जेवणाच्या

### रस्त्यावरच भरवल्या पंगती, अधिकाऱ्यांशी फोनवरुन चर्चा



पंगती धरल्याचं पाहायला मिळालं. शेतकऱ्यांनी शेतकरी बांधवांसाठी आणलेल्या खिचडीवर आंदोलक शेतकऱ्यांनी ताव मारला.

प्रांताधिकारी यांच्यासोबत बच्चू कडू यांची कांदा व मका दरावर कार्यालयात चर्चा झाल्याची माहिती आहे. मागणी मान्य न झाल्यास प्रांताधिकारी कार्यालयावर आंदोलक मुक्कामी ठिय्या मांडणार आहेत.

बच्चू कडू यांनी प्रांताधिकारी चक्क कार्यालयावरच कांदे फेकून मारले. बच्चू कडू यांच्या पाठोपाठ प्रांताधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांनीही कांदे फेकून मारले. प्रहार जनशक्ती पक्षाचा शेतकरी आक्रोश मोर्चा येवला प्रांताधिकारी कार्यालयावर धडकला होता, हजारोंच्या संख्येने शेतकरी आंदोलनात सहभागी झाले. शेतकऱ्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारचा निषेध नोंदवला, कांद्याचे पडलेले दर आणि इतर मागण्यासाठी हे आंदोलनकरण्यात आले.






# उद्धव ठाकरेंसह ९ सदस्यांना आज निरोप

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यासह ९ सदस्यांना मंगळवारी विधानपरिषदेत निरोप दिला जाणार आहे.

या ९ जणांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत येत्या १३ मे रोजी संपत असल्याने त्यांच्यासाठी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सर्व सदस्यांना निरोप दिला जाणार असून यावेळी विधानपरिषदेत शाब्दिक जुगलबंदी रंगण्याची शक्यता आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणूक निकालानंतर मुख्यमंत्रिपदावरून शिवसेना (तेव्हा पक्षात फूट पडली नव्हती) आणि भाजप यांच्यात तीव्र मतभेद झाले. या मतभेदातून उद्धव ठाकरे यांनी भाजपची साथ सोडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ठाकरे यांच्या नेतृत्वात राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तारूढ झाले. ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली तेव्हा ते विधिमंडळाचे सदस्य नव्हते. २०२० च्या विधान परिषद निवडणुकीत उद्धव ठाकरे विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले.

अमरावती थॅलेसेमिया निर्मुलन समितीचे

# अक्षय वैद्य यांना वीर बिरसामुंडा आंतराष्ट्रीय रक्तदाता पुरस्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – अमरावती थॅलेसेमिया निर्मुलन समितीचे अक्षय वैद्य यांना नुकताच पद्मश्री वीर बिरसा मुंडा आंतराष्ट्रीय रक्तदाता पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

सामाजिक कार्यात व रक्तदानाच्या क्षेत्रात अग्रगण्य असलेले व अमरावती थॅलेसेमिया निर्मुलन समिती, अमरावतीचे अक्षय वैद्य यांना रक्तदानाच्या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केल्याबद्दल तसेच थॅलेसेमियाग्रस्तांना नियमित रक्ताचा पुरवठा करण्याची अमुल्य कार्य करीत असल्या बद्दल व रक्तदान शिबिराचे आयोजन करुन रक्तदात्यांकडुन रक्त संकलन करण्याचे कार्यकरीत असल्याबद्दल उत्तरप्रदेश मधील दुद्धी येथे प्रगती फाऊंडेशन ट्रस्ट, दुद्धी, सोनभद्र द्वारा नुकताच आयोजित वीर बिरसा मुंडा आंतराष्ट्रीय रक्तदाता सन्मान समारोहामध्ये वीर बिरसा मुंडा आंतराष्ट्रीय रक्तदाता पुरस्कार पद्मश्री लौंगी भुइया, दुद्धी नगर पालिका अध्यक्ष तथा माजी आमदार रुबी प्रसाद, माजी आमदार हरिराम शेरु, ओडीसा येथील केंद्रीय अन्वेषण विभागाच्या वरिष्ठ अधिकारी संज्युक्ता चॅटर्जी आचार्य यांच्या हस्ते कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रगती फाऊंडेशन ट्रस्ट, दुद्धी अध्यक्ष विकासकुमार अग्रहरी यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी विजयकांत चौहान यांच्यासह रक्तदानाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक देशातील सामाजिक कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.अक्षय वैद्य यांना वीर बिरसा मुंडा आंतराष्ट्रीय रक्तदाता पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे ऑरेंजसिटी थॅलेसेमिया निर्मुलन समिती वरुड तसेच अमरावती थॅलेसेमिया निर्मुलन, अमरावतीचे सर्व पदाधिकारी व सदस्यांसह विविध क्षेत्रातील संस्था, संघटना, नागरिक तसेच मित्र परिवार तर्फे त्यांचे अभिनंदन होत आहे.

# उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे जागतिक मौखिक आरोग्य दिन साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – उपजिल्हा रुणालय मोर्शी येथे दि.२० मार्च रोजी उपजिल्हा रुणालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांचे मार्गदर्शनात जागतिक मौखिक आरोग्य दिवस जनजागृती करुन साजरा करण्यात आला.

याकार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक दंतचिकित्सक विभागाचे प्रमुख डॉ.पंकज मुळे तसेच परिसेविका वर्षा दारोकर यांनी जागतिक मौखिक आरोग्य दिनानिमित्त मार्गदर्शन केले. यावेळी त्यांची चुकीची जीवनपद्धती चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयी व धूम्रपान हे मौखिक आजाराचे मुख्य कारण आहे. मौखिक आरोग्यावर आपले शरीर आणि मानसिक आरोग्य अवलंबून असतं तसेच मौखिक कर्करोग दिवसेंदिवस कसा वाढत आहे. याबाबत माहिती दिली कर्करोग हा जीभ हिरड्या टाळू गालातील आतील बाजूस होतो बरेचदा तो गाल आणि हिरड्यांमध्ये दिसून येतो जेव्हा शरीरातील अनुवंशिक बदलामुळे पेशी नियंत्रणाशिवाय जास्त वाढतात तेव्हा हा कर्करोग होतो अशा प्रकारे दंतचिकित्सक डॉक्टर मुळे यांनी मौखिक कर्करोगाचे महत्त्व रुग्णांना पटवून दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन कोरडे यांनी भूषवले प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.पंकज मुळे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक दारोकार सिस्टर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे संचालन श्रीकांत गोहाळ यांनी केले.

या कार्यक्रमाला डॉ.टीगणे, मेट्रन रूथ लोखंडे, पाटील सिस्टर, स्नेहल बेहेरे, कविता इंगोले, सुजाता पांडे, कांचन राऊत, आशिष पाटील, अमोल झाडे, विनय शेलुरे, प्रशांत बेहरे, प्रकाश मंगळे, नंदू थोरात , नागोराव खडसे, काशी बारंगे व सर्व कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

# भारताला युद्धाची झळ, पंतप्रधानांनी उशीरा भाष्य करणं अयोग्य

## अशीच परिस्थिती राहिली तर...: मविच्या बैठकीत शरद पवारांकडून चिंता व्यक्त

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष आता चार आठवड्यांपासून सुरू असून मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे जगभरातील अर्थव्यवस्थेला मोठा फटका सहन करावा लागतोय.

दरम्यान, इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्यामुळे तेल आणि वायू पुरवठ्यावर परिणाम झाला असून, जागतिक ऊर्जा संकट अधिक गंभीर झाले आहे. याचा परिणाम भारतासह अनेक देशांमध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. आशियामध्ये भारतीय चलनावर याचा विशेष परिणाम होत असून, डॉलरच्या तुलनेत ते ९४.०१ पर्यंत घसरले आहे.

दरम्यान, एकंदरीत या परिस्थितीवर राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते शरद पवार यांच्याकडून युद्धजन्य परिस्थितीवरून चिंता व्यक्त करण्यात आलीय. महाविकास आघाडीच्या बैठकीत बोलताना गॅस टंचाईसोबत युद्धजन्य परिस्थितीवरून शरद पवार यांनी चिंता व्यक्त केलीय. युद्धाची अशीच परिस्थिती राहिली तर आणखी चित्र वेगळं असू शकतं, परिणामी टंचाई अधिक तीव्र होऊ शकते. अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन

# मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मोफत वंध्यत्व निवारण शिबिर



(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – आयएमए वुमन्स, जिजाऊ ब्रिगेड तसेच मल्टीस्पासिटी हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे मोफत वंध्यत्व निवारण शिबिर घेण्यात आले.

विनिता राजोरिया यांच्या हस्ते जिजाऊंच्या फोटोचे पुजन करुन शिबिराची सुरुवात करण्यात आली व उपस्थित अतिथींचे स्वागत करण्यात आले. शिबिरासाठी प्रोजेनेसिस सेंटर नागपूरची टीम व आयएमए वुमन्सच्या सर्वच डॉक्टर उपस्थित होत्या.

यामध्ये डॉ.सोनाली आंडे, डॉ.कविता देशमुख, डॉ.शरयु झोटिंग, डॉ.रुपाली जैन, डॉ.समता चौधरी, डॉ.अनिता गोधने, डॉ.तृप्ती होले तसेच जिजाऊ ब्रिगेडचे सर्वच पदाधिकारी उपस्थित होत्या. त्यामध्ये जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा डॉ.कविता देशमुख, सचिव नंदिनी ठाकरे, अर्चना सोलव, अनुराधा देशमुख, दिपाली कनाटे, मंजुश्री भड, वंदना बारस्कर, योगिता नागमोते या सर्वांनी शिबिरामध्ये परिश्रम घेतले.

शिबिरामध्ये ४० हुन अधिक लाभार्थ्यांनी लाभ घेतला. सर्वच डॉक्टरांनी शिबिरातील लाभार्थ्यांच्या शंकेचे समाधान केले. कार्यक्रमाचे संचालन नंदिनी ठाकरे व डॉ.कविता देशमुख यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# पिंटु उर्फ गोपाल मगर्दे यांचे निधन




(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील पिंटु उर्फ गोपाल मगर्दे (४४) या युवकाचे दीर्घ आजाराने त्यांच्या निवासस्थानी दुःखद निधन झाले असुन आप्तेष्ट, नातेवाईक व गावकऱ्यांच्या उपस्थितीत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर हिंदु स्मशानभूमी शेंदुरजनाघाट येथे शोकाकुल वातावरण अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, ३ भाऊ, २ बहिणी, जावई, पुतणे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्याच्या निधनामुळे व्यतीत झालेल्या मित्र परिवाराच्या वतीने आठवडी बाजार मलकापूर येथे पिंटु उर्फ गोपाल मगर्दे यांच्या आत्म्यास शांती लाभण्याकरीता श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# अतिक्रमणामुळे देऊतवाडा ते चैनपुर शिव रस्ता बंद

## येत्या ८ दिवसात कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील मौजा देऊतवाडा–चैनपुर परिसरातील महत्त्वाचा शिवरस्ता अतिक्रमणामुळे बंद पडला असून त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाकडुन मातीकाम व खडीकरणासाठी मान्यता मिळालेला हा रस्ता तातडीने अतिक्रमणमुक्त करुन काम सुरु करावे, अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

उत्तम विधाते यांच्या शेतापासुन ते रमेश राऊत मेंढी शिव रस्त्यापर्यंत असलेला हा शिवरस्ता अनेक शेतकऱ्यांच्या शेतीच्या वहिवाटीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांची शेती या मार्गावर अवलंबुन असून शेतीमालाची ने–आण करण्यासाठी हा एकमेव मार्ग असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शासनाच्या मातोश्री पांदण रस्ते योजने अंतर्गत या रस्त्याला मातीकाम व खडीकरणासाठी मान्यता मिळाली आहे.

जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मोर्शी यांनी टेंडर प्रक्रिया राबविली असता रस्त्यावर अतिक्रमण असल्यामुळे कोणताही कंत्राटदार हे काम स्विकारण्यास पुढे येत नसल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. त्यामुळे आजपर्यंत या रस्त्याचे काम सुरु होऊ शकलेले नाही.



**८ दिवसांत कारवाई न झाल्यास आंदोलन**

“ शासनाने मंजुर केलेल्या रस्त्याचे काम तातडीने सुरु करावे. अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागेल, असा इशारा देऊतवाडा–चैनपुर परिसरातील शेतकरी यांनी दिला आहे.

**फळिपकांना बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यात अडथळे**

“ या भागात मोठ्या प्रमाणावर मोसंबी व संत्रा यांसारखी फळिपके घेतली जातात. मात्र रस्त्याची दुरवस्था व अतिक्रमणामुळे शेतीमाल वेळेवर बाजारात नेता येत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

**केवळ दोन शेतकऱ्यांचा विरोध**

“ रस्त्यालगत असलेल्या बहुतांश शेतकऱ्यांनी रस्ता खुला करण्यास संमती दर्शविली आहे. मात्र केवळ दोन शेतकरी या कामास विरोध करीत असल्याने उर्वरित १० ते १५ शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**२०२३ पासून पाठपुरावा, तरीही कारवाई नाही**

“ या संदर्भात शेतकऱ्यांनी सन २०२३ पासून तहसीलदार कार्यालयाकडे वारंवार मागणी केली आहे तसेच २६ फेब्रुवारी २०२६ आणि ११ मार्च २०२६ रोजीही निवेदन देण्यात आले. यापुर्वी ८ डिसेंबर २०२५ रोजी उपजिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडेही अर्ज सादर करण्यात आला होता. त्यानंतरही ठोस कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# संपादकीय

{ कधीकधी अपमान सहन केल्याने कमीपणा येत नाही, उलट आपले सामर्थ्य वाढते }

## भोंदूगिरीचा बाजार आणि राजसत्तेचा वरदहस्त

भारतासारख्या प्रगत आणि विज्ञाननिष्ठेची परंपरा सांगणाऱ्या देशात आजही 'भोंदूगिरी' हा विषय समाजाला लागलेली एक मोठी वाळवी ठरत आहे. दर काही वर्षांनी एखाद्या भोंदूबाबाचे साम्राज्य उघडकीस येते, तेव्हा त्यातून बाहेर पडणारी कोट्यवधी रुपयांची इस्टेट, अमर्याद जमीन आणि अघोरी कृत्ये पाहून सामान्य माणसाचे डोळे विस्फारतात. परंतु, हे केवळ एका व्यक्तीचे पाप नसते, तर ते समाजमन, प्रशासकीय ढिलाई आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'राजकीय पाठबळ' या तिघांच्या अभद्र युतीचे अपत्य असते. या प्रवृत्तीला वेळीच पायबंद घातला नाही, तर भविष्यात सामाजिक स्वास्थ्य पूर्णपणे धोक्यात येईल यात शंका नाही.

राजकीय पाठबळ: साम्राज्याचा पाया

कोणताही भोंदूबाबा एका रात्रीत कोट्यवधींची मालमत्ता उभी करू शकत नाही. त्याच्या या प्रवासात त्याला राजसत्तेचे अभय मिळते, हे आता सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ झाले आहे. राजकीय नेत्यांना 'मतपेढी' हवी असते, तर भोंदूबाबांना आपल्या काळ्या कारनाम्यांवर पांघरूण घालण्यासाठी 'सत्ता' हवी असते. जेव्हा एखादा मोठा नेता एखाद्या बाबाच्या चरणी लीन होतो, तेव्हा सामान्य जनतेला वाटते की, 'जर एवढा मोठा माणूस तिथे जात असेल, तर नक्कीच तिथे काहीतरी दैवी शक्ती असेल.' हाच भ्रम भोंदूबाबांच्या साम्राज्याचा पाया ठरतो. या बदल्यात, निवडणुकांच्या वेळी हे बाबा आपल्या भक्तगणांना विशिष्ट पक्षाला मतदान करण्याचे फर्मान सोडतात. हे 'लेण-देण' लोकशाहीच्या मुळावर उठले आहे. इस्टेट आणि भ्रष्टाचाराचे मॉडेल भोंदूबाबांकडे जमा होणारी इस्टेट ही केवळ भक्तांच्या दानातून येत नाही. त्यामागे जमिनींचे बेकायदेशीर व्यवहार, करचोरी आणि अनेकदा मनी लॉंड्रिंगचे जाळे असते. चॅरिटी ट्रस्टच्या नावाखाली या संस्था उभारल्या जातात आणि त्यातून कर सवलती लाटल्या जातात. सरकारी जमिनी कवडीमोलाने मिळवणे असो वा वनजमिनींवर अतिक्रमण करणे, राजकीय आशीर्वादाशिवाय हे शक्यच नाही. जेव्हा कायदा या बाबांच्या दारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा सत्तेच्या उच्च पदस्थ खुर्च्यांवरून दूरध्वनी फिरतात आणि तपासाची चक्रे थांबवली जातात. सामाजिक मानसिकता: भोंदूगिरीचे खतपाणी

भोंदूगिरी फोफावण्यामागे केवळ नेतेच जबाबदार नाहीत, तर आपली सामाजिक मानसिकताही तितकीच कारणीभूत आहे. शिक्षण वाढले तरी वैज्ञानिक दृष्टिकोन वाढलेला नाही. आजारपण, बेरोजगारी, कौटुंबिक कलह किंवा अचानक आलेले संकट यावर उपाय शोधण्यासाठी माणूस तर्कसंगत मार्गापेक्षा 'चमत्कारा'कडे अधिक झुकतो. ही हतबलता भोंदूबाबांच्या पथ्यावर पडते. श्रद्धेचे रूपांतर जेव्हा अंधश्रद्धेत होते, तेव्हा बुद्धी गहाण ठेवली जाते आणि तिथूनच शोषणाला सुरुवात होते. प्रशासकीय अपयश आणि कायद्याचा धाक महाराष्ट्र हे 'अंधश्रद्धा निर्मूलन कायदा' करणारे देशातील पहिले राज्य आहे.

# जागतिक राजकारणातील 'हाहाकार' आणि नव्या संघर्षाची नांदी

जागतिक राजकारणाच्या पटावर डोनाल्ड ट्रम्प यांचे पुनरागमन हे केवळ एका देशाच्या सत्तेत झालेले परिवर्तन नाही, तर ते एका नव्या जागतिक व्यवस्थेचे सूतोवाच आहे.

'अमेरिका फर्स्ट' या धोरणाखाली ट्रम्प यांनी घेतलेले धाडसी, अनपेक्षित आणि अनेकदा वादग्रस्त निर्णय जगाला थक्क करणारे ठरले आहेत. गाझामधील विनाश असो, व्हेनेझुएलातील सत्तांतर असो वा इराणच्या नेतृत्वाचा बिमोडट्रम्प यांच्या रणनीतीने मित्रराष्ट्र आणि शत्रू दोघांनाही गोंधळात टाकले आहे. आता प्रश्न उरतो की, यानंतर ट्रम्प यांच्या निशाण्यावर कोणता देश असेल?१. गाझा: विनाशाच्या राखेवर 'पर्यटन शहरा'चे स्वप्न?गाझामध्ये सुरू असलेला संघर्ष आणि तिथे झालेली जीवितहानी पाहून जग हळहळत असताना, ट्रम्प यांनी तिथे एक भव्य 'टुरिझम हब' किंवा पर्यटन शहर उभारण्याची भाषा केली आहे.

हे विधान केवळ व्यापारी दृष्टिकोनातून केलेले नाही, तर ते पॅलेस्टिनी प्रश्नाचे स्वरूप कायमचे बदलण्याचा प्रयत्न असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. विनाशाच्या छायेत असलेल्या जमिनीवर रिअल इस्टेटचा विचार करणे हे ट्रम्प यांच्या 'बिझनेसमन' वृत्तीचे द्योतक आहे.

यामुळे मध्यपूर्वेतील राजकारण आता मानवाधिकारांकडून थेट जमिनीच्या व्यापाराकडे वळताना दिसत आहे.२. इराण आणि व्हेनेझुएला: सत्तेच्या केंद्रस्थानी प्रहारइराणच्या सर्वोच्च नेत्यांना लक्ष्य करणे आणि व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांच्या बाबतीत घेतलेली टोकाची भूमिका ही ट्रम्प यांच्या 'मॅक्झिमम प्रेशर' धोरणाची अंमलबजावणी आहे. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला खीळ घालण्यासाठी त्यांनी केवळ निर्बंध लादले नाहीत, तर नेतृत्वाचा पायाच उखडून टाकण्याचा प्रयत्न केला. व्हेनेझुएलामध्ये रशिया आणि चीनचा प्रभाव कमी करण्यासाठी त्यांनी थेट सत्तेलाच आव्हान दिले आहे.



या घटनांमुळे लॅटिन अमेरिका आणि आखाती देशांमध्ये अमेरिकेचा दरारा पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

आता ट्रम्प यांच्या निशाण्यावर कोण? ट्रम्प यांच्या आक्रमक पावलांचा विचार करता, आगामी काळात खालीलपैकी काही देश त्यांच्या 'हिटलिस्ट'वर असू शकतात:अ) चीन: आर्थिक महायुद्धाचा पुढचा टप्पाट्रम्प यांच्यासाठी चीन हा केवळ प्रतिस्पर्धी नाही, तर तो अमेरिकेच्या अस्तित्वासाठी सर्वात मोठा धोका आहे. व्यापार युद्ध: ट्रम्प चीनवर ६०% पेक्षा जास्त आयात शुल्क लादण्याच्या तयारीत आहेत.तंत्रज्ञान: चिप मेकिंग आणि एआय क्षेत्रात चीनची नाकेबंदी करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट असेल.तैवान प्रश्न: जर चीनने तैवानवर दबाव वाढवला, तर ट्रम्प लष्करीपेक्षा आर्थिक नाकेबंदी करून चीनला गुडघ्यावर आणू शकतात.ब) उत्तर कोरिया: मैत्री की संघर्षकिम जोंग उन यांच्याशी ट्रम्प यांचे संबंध नेहमीच अनपेक्षित राहिले आहेत. एकदा मैत्रीचा हात देणारे ट्रम्प, जर उत्तर कोरियाने अण्वस्त्र चाचण्या थांबवल्या नाहीत, तर पुन्हा एकदा 'फायर अँड फ्युरी'चा पवित्रा घेऊ शकतात.क) मेक्सिको: सीमेवरील 'ड्रग वॉर'अमेरिकेत होणारी अमली पदार्थांची तस्करी आणि बेकायदेशीर स्थलांतर रोखण्यासाठी ट्रम्प मेक्सिकोच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची शक्यता नाकारता येत नाही. मेक्सिकन ड्रॅग कार्टेल्सना 'दहशतवादी संघटना' घोषित करून तिथे थेट लष्करी कारवाई करण्याचे संकेत त्यांनी आधीच दिले आहेत.

ट्रम्प यांच्या रणनीतीचे वैशिष्ट्यपैलू परिणाम अनपेक्षित पणाशत्रू देशाला सावध होण्याची संधीच मिळत नाही.आर्थिक नाकेबंदीयुद्धापेक्षा आर्थिक निर्बंधांचा वापर करून देशाला पोकळ करणे.थेट संवादमध्यस्थांशिवाय थेट प्रमुखांशी बोलणे किंवा त्यांना लक्ष्य करणे.निष्कर्ष: बदलती जागतिक समीकरणेडोनाल्ड ट्रम्प यांची कार्यपद्धती ही 'शांतीसाठी शक्ती' या तत्त्वावर आधारित आहे.

त्यांच्या मते, अमेरिकेने इतके शक्तिशाली असावे की कोणीही त्याला आव्हान देण्याचे धाडस करू नये. मात्र, या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय कायदे आणि राजनैतिक शिष्टाचार धाब्यावर बसवले जात असल्याचा आरोपही होतो.पुढील निशाणा कदाचित चीन असेल, कारण जागतिक अर्थव्यवस्थेवर वर्चस्व गाजवण्यासाठी चीनला रोखणे हे ट्रम्प यांच्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे. रशिया-युक्रेन युद्धाबाबतही ट्रम्प यांची भूमिका युक्रेनची मदत थांबवून रशियाशी समझोता करण्याची असू शकते, जेणेकरून ते आपली पूर्ण ताकद चीनच्या विरोधात वापरू शकतील.येणारा काळ हा जागतिक शांततेसाठी आव्हानात्मक असला, तरी ट्रम्प यांच्या समर्थकांसाठी तो 'अमेरिकेचे सुवर्णयुग' परत आणणारा काळ ठरू शकतो.

# स्वातंत्र्य: मानवी अस्तित्वाचा श्वास आणि नैतिक अधिष्ठान

स्वातंत्र्य हा शब्द उच्चारताच मनात एक वेगळ्या प्रकारची सकारात्मकता आणि ऊर्जेची भावना दाटून येते. स्वातंत्र्य म्हणजे केवळ बंधनांचा अभाव नव्हे, तर ती एक अशी अवस्था आहे जिथे मानवी व्यक्तिमत्त्वाचा विकास पूर्णत्वास जातो. स्वातंत्र्याची व्याप्ती इतकी अफाट आहे की, ते केवळ राजकीय चौकटीत अडकलेले नाही, तर ते मानवी जीवनाच्या प्रत्येक पैलूचा कणा आहे.

स्वातंत्र्याचे बहुआयामी स्वरूप स्वातंत्र्य ही एक राजकीय गरज आहे कारण ती लोकशाहीचा आधार आहे. मात्र, त्यासोबतच ती एक नैतिक भावना आहे. जेव्हा आपण म्हणतो की 'स्वातंत्र्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे', तेव्हा आपण केवळ हक्काची गोष्ट करत नसून, आत्मसन्मानाची जपवणूक करत असतो. स्वतःच्या विवेकाने जगणे आणि नैतिकतेच्या चौकटीत राहून निर्णय घेणे, हे खऱ्या स्वातंत्र्याचे लक्षण आहे.

सामाजिक आणि आर्थिक पातळीवर स्वातंत्र्याचा अर्थ अधिक खोलवर जातो. जोपर्यंत समाजात विषमता, जात-पात आणि भेदभावाच्या भिंती आहेत, तोपर्यंत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य मिळू शकत नाही. तसेच, आर्थिक स्वातंत्र्य हे कोणत्याही व्यक्तीच्या स्वावलंबनाचा पाया आहे. आर्थिकदृष्ट्या परावलंबी असणारी व्यक्ती कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र असू शकत नाही. गरिबी आणि बेरोजगारी या स्वातंत्र्याच्या मार्गातील सर्वात मोठी आव्हाने आहेत.

सांस्कृतिक आणि



नैसर्गिक दृष्टिकोनातून पाहिले तर स्वातंत्र्य ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे. निसर्गात प्रत्येक जीव स्वतंत्र जगण्याचा प्रयत्न करतो, मग मानव का मागे राहील? आपल्या संस्कृतीचे जतन करत असतानाही, विचारांची देवाणघेवाण आणि मुक्त अभिव्यक्ती हे स्वातंत्र्याचेच प्रकटीकरण आहे. स्वातंत्र्य: एक अविभाज्य अधिकार 'व्यक्ति असो वा सार्वभौम राष्ट्र, त्याचे स्वातंत्र्य बाधित करण्याचा दुसऱ्या कोणालाही अधिकार नाही,' हे विधान स्वातंत्र्याच्या सार्वत्रिकतेवर शिक्कामोर्तब करते. जेव्हा आपण दुसऱ्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतो, तेव्हा आपण केवळ अन्याय करत नाही, तर आपण मानवी हक्कांचे उल्लंघन करत असतो. व्यक्तीचे स्वातंत्र्य: प्रत्येकाला स्वतःचे आयुष्य आपल्या आवडीनुसार जगण्याचा, स्वतःचे विचार मांडण्याचा आणि स्वतःच्या प्रगतीचे मार्ग निवडण्याचा अधिकार आहे. राष्ट्राचे स्वातंत्र्य: राष्ट्राचे स्वातंत्र्य म्हणजे त्या देशाच्या सार्वभौमत्वाचा आदर. कोणत्याही बाह्य शक्तीने दुसऱ्या देशाच्या अंतर्गत धोरणांमध्ये ढवळाढवळ करणे, हे आंतरराष्ट्रीय नीतिमत्तेच्या विरोधात आहे. स्वातंत्र्याची जबाबदारी


स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील रेषा अतिशय धूसर आहे. स्वातंत्र्य हे कधीही स्वैराचाराला निमंत्रण देत नाही. जेव्हा माझ्या स्वातंत्र्याचा वापर दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्यासाठी केला जातो, तेव्हा ती स्वातंत्र्याची व्याख्या संपते.

खरी लोकशाही आणि स्वातंत्र्य हे 'सहअस्तित्वा'च्या भावनेतूनच टिकू शकतात. 'माझे नाक आणि समोरच्या व्यक्तीचा चेहरा' यातील अंतर म्हणजे माझे स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांचा समतोल होय. थोडक्यात सांगायचे तर, स्वातंत्र्य ही केवळ एक संकल्पना नसून ती मानवी जीवनाची ऊर्जा आहे. ही भावना जितकी नैसर्गिक आहे, तितकीच ती जपावी लागणारी नैतिक संपदा आहे. आजच्या काळात, जिथे जगाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत आहे, तिथे स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजून घेणे आणि तो जपणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

# आकाशाचा वेध घेणारा महान खगोलशास्त्रज्ञ

विज्ञानाच्या इतिहासात एडमंड हॅली हे नाव एका अशा शास्त्रज्ञाचे आहे, ज्याने केवळ ताऱ्यांचा अभ्यास केला नाही, तर अवकाशातील गतीला गणिताची जोड देऊन भविष्याचा वेध घेतला. हॅली यांचा जन्म ८ नोव्हेंबर १६५६ रोजी लंडनमध्ये झाला. जरी त्यांचे नाव आज 'हॅलीचा धूमकेतू' या नावाने जगप्रसिद्ध असले, तरी त्यांचे कार्य केवळ तिथपर्यंत मर्यादित नव्हते.

हॅलीचा धूमकेतू आणि ऐतिहासिक भाकीत हॅली यांच्या कारकीर्दीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे धूमकेतूंचा अभ्यास. १७ व्या शतकापर्यंत धूमकेतू हे देवाचा कोप किंवा संकटाचे संकेत मानले जात असत. हॅली यांनी जुन्या नोंदींचा अभ्यास करून असे सिद्ध केले की, १५३१, १६०७ आणि १६८२ मध्ये दिसलेला धूमकेतू हा वेगळा नसून एकच आहे. त्यांनी गणिताच्या आधारे भाकीत केले की, हा धूमकेतू पुन्हा १७५८ मध्ये दिसेल. दुर्दैवाने, ते पाहण्यासाठी हॅली जिवंत नव्हते, पण त्यांच्या मृत्यूनंतर बरोबर



१७५८ मध्ये तो धूमकेतू आकाशात प्रकट झाला. तेव्हापासून त्याचे नाव 'हॅलीचा धूमकेतू' पडले.

न्यूटन आणि हॅली यांचे नाते सर आयझॅक न्यूटन यांना त्यांचे जगप्रसिद्ध पुस्तक 'प्रिन्सिपिया' लिहिण्यासाठी आणि ते प्रकाशित करण्यासाठी प्रवृत्त करण्यात हॅली यांचा मोठा वाटा होता. जर हॅली यांनी न्यूटन यांना आर्थिक आणि मानसिक पाठबळ दिले नसते, तर कदाचित गुरुत्वाकर्षणाचे नियम जगासमोर येण्यास अजून उशीर झाला असता.

इतर महत्त्वाचे योगदान नकाशे आणि समुद्रशास्त्र: हॅली यांनी जगातील पहिला 'हवेच्या दाबाचा' आणि 'वारा वाहण्याच्या दिशांचा' नकाशा तयार केला. ताऱ्यांची गती: ताऱ्यांनाही स्वतःची गती असते, हे त्यांनीच पहिल्यांदा जगाला सांगितले.

सांख्यिकी: त्यांनी मानवी मृत्यूदराचा तक्ता तयार केला, ज्याचा उपयोग आजही आयुर्विमा क्षेत्रात केला जातो. एडमंड हॅली हे केवळ खगोलशास्त्रज्ञ नव्हते, तर ते एक उत्तम गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ आणि संशोधक होते. १४ जानेवारी १७४२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांनी विज्ञानाला दिलेली दृष्टी आजही संशोधकांसाठी प्रेरणादायी आहे. आकाशात जेव्हा जेव्हा हॅलीचा धूमकेतू (दर ७५-७६ वर्षांनी) येतो, तेव्हा तेव्हा या महान शास्त्रज्ञाच्या बुद्धिमत्तेची साक्ष संपूर्ण जगाला पटते.

# 'डाएट'चा फज्जा आणि सोशल मीडियाचा थाट!

**बब्या :** जो नेहमी डाएट करण्याचे प्लॅन्स बनवतो.

**गण्या:** जो बब्याची मस्करी करण्यात पटाईत आहे.

**बब्या:** (हातात सॅलडची डिश घेऊन) गण्या, आजपासून बघच तू! हा बब्या आता फक्त 'हेल्दी डाएट' करणार. पुढच्या महिन्यात मी तुला एकदम 'फिट' दिसणार!

**गण्या:** (हसत) अरे वा! हे नवीन आहे. पण बब्या, कालच तर तू हॉटेलमध्ये 'स्पेशल मिसळ-पाव' आणि 'गुलाबजाम'वर ताव मारताना दिसला होतास ना?

**बब्या:** अरे, तो कालचा दिवस 'चीट डे' होता! आणि डाएट सुरू करण्यापूर्वी शरीराला निरोप द्यावा लागतो ना, म्हणून खाल्लं थोडं जास्त.

**गण्या:** बरं, मग या सॅलडमध्ये काय काय आहे?

**बब्या:** यात कोबी आहे, काकडी आहे आणि थोडी गाजरं आहेत. एकदम नॅचरल!




**गण्या:** आणि बाजूला तो वडापावचा कागद कशाचा आहे?

**बब्या:** (गडबडून) तो... तो काही नाही रे! सॅलड खाताना वास यावा म्हणून आणला होता. वासाने पोट भरतं असं वाचलंय मी फेसबुकवर!

**गण्या:** वा! म्हणजे तू 'डिजिटल डाएट' करतोयस तर! पण बब्या, मघाशी तू तुझ्या इन्स्टाग्रामवर याच सॅलडचा फोटो टाकलायस आणि कॅप्शन दिलंय "Fitness is my life". पण खरं सांग, फोटो काढल्यावर तू ते सॅलड खाल्लंस का?

**बब्या:** (लाजत) खरं सांगू? फोटो काढताना सॅलड छान दिसतं, पण चव मात्र गवत खाल्ल्यासारखी लागते रे. फोटो काढून झाला की मी डिश बाजूला ठेवून देतो आणि गुपचूप फ्रीजमधलं श्रीखंड खातो.

**गण्या:** म्हणजे तुझं डाएट फक्त 'लाईक्स' मिळवण्यापुरतं आहे तर! अरे, डाएट पोटात जायला हवं, फक्त प्रोफाईलवर नको.

**बब्या:** जाऊ दे रे! सध्याच्या काळात फिट दिसण्यापेक्षा 'फिट असल्याचं नाटक' करणं जास्त सोपं आहे.

**गण्या:** चल, मग आता हे नाटक बंद कर आणि चल आपण दोघं जाऊन मस्त गरम भजी खाऊया. उद्यापासून नक्की डाएट करू!

**बब्या:** (खुशीत) हा विचार मला पटला! चल निघूया, पण भजी खातानाचा फोटो मात्र नको टाकायला, नाहीतर लोक मला ट्रोल करतील!

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# गुरुकुंज मोझरी येथे 'मेरा युवा भारत' तर्फे शहीद दिन साजरा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतीवीर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या बलिदानाच्या स्मृतीनिमित्त 'मेरा युवा भारत' तर्फे आज गुरुकुंज मोझरी येथे 'शहीद दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत असलेल्या 'मेरा युवा भारत' अमरावती कार्यालयाच्या वतीने श्रीगुरुदेव अध्यात्म केंद्र, गुरुकुंज मोझरी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी परिसरात स्वच्छता




अभियान राबवून स्वच्छतेचा संदेश दिला, तसेच 'भगतसिंग अमर रहे' अशा घोषणा देत पदयात्रा काढली.

या कार्यक्रमा प्रसंगी श्रीगुरुदेव अध्यात्म केंद्र गुरुकुलचे संचालक रविदादा मानव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित केले, तर प्रास्ताविक प्रा. अंकुश मानकर यांनी केले. शहीद दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी भाषणे दिली. विद्यार्थ्यांनी वीर शहिदांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण केली.

## डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयात

# भूगोल विभागाच्या वतीने जागतिक जलदिन साजरा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाच्या वतीने जागतिक जलदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्रमुख वक्ते म्हणुन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.दिनेश खेरडे तर प्रमुख अतिथी म्हणुन गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.लुंबिनी गणवीर, भुगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.तिलकचंद धोटे उपस्थित होते. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.तिलकचंद धोटे यांनी प्रास्तविकातुन विद्यार्थ्याना जल दिन साजरा करण्यामागची भूमिका स्पष्ट करुन सजीवांसाठी पाणी हेच जीवन आहे, हे समजुन सांगितले. प्रमुख वक्ते म्हणुन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.दिनेश खेरडे यांनी 'जागतिक जल दिन २२ मार्च रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व सांगितले तर प्रमुख अतिथी डॉ.लुंबिनी गणवीर यांनी दिवसेंदिवस वाढती पाण्याची टंचाई पाहता, पाण्याचा वापर जपुन करणे आणि पाण्याच्या संवर्धनासाठी जनजागृती करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी पाणी हे जीवन आहे. जर आपण आताच पाणी वाचवले नाही तर भविष्यात मोठे जलसंकट निर्माण होऊ शकते, त्यामुळे पाण्याची बचत काळाची गरज असल्याचे मत त्यांनी उपस्थितांपुढे मांडले. कार्यक्रमाचे संचालन अंजली उईके तर आभार श्रावणी ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## पेस आयआयटी व मेडिकल येथे

# १० वी नंतर काय? विषयावर मार्गदर्शन कार्यशाळा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक पेस आयआयटी व मेडिकल इन्स्टिट्युट येथे १० वी नंतर काय? या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नुकत्याच १० वीच्या बोर्डाच्या परीक्षा आटोपल्या आहेत. सद्य:स्थितीत १० वी नंतर विद्यार्थी आणि पालक यांच्या डोक्यात पुढील करिअर विषयी विचार चक्र चालु होते. जेईई, नीट आणि सिइटीच्या माध्यमातुन आपले उज्ज्वल भविष्य घडवण्याचा बहुतांशी विद्यार्थ्यांचा कल असतो. भविष्यात इंजिनिअरिंग मेडिकल आणि इतर आयआयटी सारख्या शैक्षणिक



संस्थांमध्ये प्रवेश मिळण्याच्या उद्देशातुन विद्यार्थ्यांचे कोर्स निवडी बाबतचे नियोजन दहावीची परीक्षा संपल्याबरोबरच चालु होते. यात पालकांचाही सहभाग असतो परंतु भविष्यात आपले करिअर घडवण्याकरिता नेमका कोणता पर्याय निवडावा या बाबत गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. यावर उत्तम तोडगा म्हणुन पेस आय आय टी व मेडिकल द्वारा दहावी नंतर काय या विषयावर विद्यार्थी व पालकांकरिता मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या मार्गदर्शन कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे, मार्गदर्शक म्हणुन मुख्य व्यवस्थापक भुषण गवई, प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.विवेक देशमुख, प्रा.अर्चना फुटाणे, प्रा.विकास पटेल, प्रा.सतीश कुमार सिंग, प्रा.प्रिन्स गौतम यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना १० वी नंतर काय संधी आणि आवाहने या विषयावर मार्गदर्शन केले. पेस आयआयटी व मेडिकल द्वारा पेस एक्झाम टॅलेंट सर्च ही विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली होती. यामध्ये प्रथम येणारी खुशी सुरजुसे व तिच्या पालकांना पेस आयआयटी व मेडिकलमध्ये प्रवेशाकरी ५० हजार रुपयाचे शिष्यवृत्तीचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी पेस आयआयटी व मेडिकलचे व्यवस्थापक भुषण गवई, प्रा.विकास पटेल, भौतिकशास्त्र विभाग आय आय टी भुवनेश्वर, रसायनशास्त्र विभाग आयआयटी रोपर प्रा.प्रिन्स गौतम, एनआयटी गणित विभाग प्रा.सतीश कुमार सिंग, जीवशास्त्र विभाग प्रा.अर्चना फुटाणे, सहव्यवस्थापक आकाश बाहे, समुपदेशक विराग म्हस्की, अकॅडमीक समन्वयक मयुरी धवड, समुपदेशक मयुरी ढोक, अकाऊंटट दिपक नाडगे, मयुर चौरासे, लोकेश शेळके, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालकांची उपस्थिती होती. या कार्यशाळेचे संचालन प्रा.अमरदीप खाडे यांनी केले.

# समाजकारणातुनच राजकारणाचा उदय



## आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे प्रतिपादन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जरुड** – कोणताही व्यक्ती थेट राजकारणात येत नाही तर त्यामागे समाज कारणाची भक्कम पार्श्वभूमी असते समाज सेवेच्या माध्यमातुनच जनसंपर्क वाढतो आणि त्यातुनच राजकीय वाटचाल घडत जाते, असे प्रतिपादन आमदार उमेश यावलकर यांनी केले.

ते जरुड येथे आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की २० लोकांची संघटना उभी करणे आणि सर्वांना एका विचारधारेत बांधणे हे सोपे नसते. मात्र अभिनव मित्र परिवार, जरुड या समुहाने तब्बल ८० सदस्यांना एकत्र आणुन विविध सामाजिक उपक्रम राबविले ही अभिमानाची बाब आहे, असे उपक्रम चालु ठेवने ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमुद केले.

यावेळी येथील उद्योजक राजेंद्र कुऱ्हाडे व जेष्ठ पत्रकार विष्णु राऊत यांच्या संयुक्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात आमदार यावलकर यांची उपस्थिती राहुन दोघांनाही शुभेच्छा दिल्या तसेच अभिनव मित्र परिवाराच्या सामाजिक कार्याचे कौतुक करुन अभिनंदन केले.

या नियोजीत कार्यक्रमाला शिवाजी वानखडे, समाज प्रबोधनकार मोहन लांडगे, रिंकेश राजस, विनोद बाबुलकर, मिनेश खांडेकर, धनराज अंबाडकर, योगेश तुमराम, गजानन चव्हाण, वासुदेव वाडबुदे, रमेश चरपे, क्रुष्णा कळसकर, प्रशांत डकरे, विजय बिजवे, राजीव वाडेकर, दिपक होले, हेमंत टोंगसे, योगेश कासे, सचिन वानखडे, माजी पंचायत समिती सदस्या अंजली तुमराम आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विस्तारीत कोस्टल रोड प्रकल्पाच्या आड येणाऱ्या वर्सोव्यातील बांधकामांवर कारवाई

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई :–** मुंबई किनारी रस्ता (उत्तर) प्रकल्पात अडथळा ठरणाऱ्या वर्सोवा आराम नगर येथील ३३ बांधकामांवर महापालिका के पश्चिम विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली. यामध्ये ३ निवासी आणि २९ व्यावसायिक बांधकामांचा समावेश आहे. ही कारवाई करण्यात आल्यामुळे विस्तारित कोस्टल रोडच्या मार्गातील अडथळ दूर करण्यात आल्यामुळे या प्रकल्पाच्या कामाला आता गती मिळणार आहे. महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांचे विशेष मार्गदर्शनाखाली उपायुक्त (परिमंडळ ४) भाग्यश्री कापसे मार्गदर्शनाखाली व के पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त चक्रपाणी अल्ले यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. मुंबई महानगरपालिकेकडून मुंबई किनारी रस्ता (उत्तर) प्रकल्पाचे अर्थात विस्तारीत कोस्टल रोड प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे. वेसावे ते दहिसरदरम्यान होणाऱ्या या मार्गाच्या बांधकामात वर्सोवा येथील आराम नगर परिसरातील बांधकामांमुळे या प्रकल्प कामांमध्ये अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे, येथील ३३ बांधकामांवर सोमवारी कारवाई करण्यात आली. यामध्ये ३ निवासी आणि २९ व्यावसायिक बांधकामांचा समावेश आहे.

# एक एकरातुन युवा शेतकऱ्याला २ लाख ७२ हजारांचे उत्पन्न

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## सेंद्रिय शेतीतुन थेट ग्राहकांपर्यंत भाजीपाला विक्री

**वरुड** – तालुक्यातील एका तरुण शेतकऱ्याने फक्त १ एकर क्षेत्रात सेंद्रिय पद्धतीने विविध भाजीपाला व फळपिकांची लागवड करुन थेट ग्राहकांपर्यंत घरपोच विक्री करत शेती क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. एक एकरातुन युवा शेतकऱ्याला २ लाख ७२ हजारांचे उत्पन्न मिळविले आहे.

आजच्या काळात शेतीकडे पाठ फिरवणाऱ्या तरुणांसाठी हा प्रयोग प्रेरणादायी ठरत असुन कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळवण्याचा मार्ग त्यांनी दाखवुन दिला आहे. या १ एकर क्षेत्रात त्यांनी वांगी, लाल भेंडी, हिरवी भेंडी, हिरवी मिरची, मोसंबी, तुरीच्या शेंगा, कारली, पालक, सांबार भाजी, गवार शेंगा, अंबाडीची फुले या सारखी विविध पिके सेंद्रिय पद्धतीने घेतली. पीक व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन आणि नैसर्गिक घटकांचा योग्य वापर यामुळे उत्पादनात चांगली वाढ झाली. या सर्व पिकांमधुन एकुण २ लाख २३ हजार ७५० रुपये इतके उत्पन्न मिळाले तसेच एकाच क्षेत्रात आंतरपीक म्हणुन घेतलेल्या तुरीपासून २ क्विंटल उत्पादन मिळाले. त्यापासुन डाळ तयार करुन विक्री केल्यास सुमारे २४ हजार इतके उत्पन्न मिळाले. विविध प्रकारच्या आळु (काळा, मलबेरी, निळा,



फाडी) यांची लागवड करुन त्यातुन एकत्रित २५ हजार उत्पन्न मिळाले. यामुळे एकुण उत्पन्न २ लाख ७२ हजार ७५० रुपये इतके झाले आहे.

या संपुर्ण शेतीसाठी फक्त २१ हजार ७०० इतकाच खर्च आला असुन निव्वळ नफा २ लाख ५१ हजार ५० रुपये इतका मिळाला आहे. एवढ्या कमी खर्चात एवढे मोठे उत्पन्न मिळवणे ही विशेष बाब असून योग्य नियोजन आणि सेंद्रिय पद्धतीचा वापर केल्यास शेती अत्यंत फायदेशीर ठरु शकते, हे यावरुन स्पष्ट होते. या यशामागे सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण, सततचे मार्गदर्शन आणि प्रयोगशील वृत्ती महत्त्वाची ठरली. पाणी फाऊंडेशनच्या शेतकरी चषक स्पर्धेमुळे शेतीकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळाली तसेच कृषी विभाग यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. यासोबतच वरुड येथील वडसावित्री ऑर्गेनिक-जैविक निविष्ठा संसाधन व मार्गदर्शन केंद्राचे सीईओ म्हणुन ते कार्यरत असून या केंद्राच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीविषयी प्रशिक्षण दिले जाते.

जैविक निविष्ठा घरच्या घरी कशा तयार करायच्या? शेतीचा खर्च कसा कमी करायचा? प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते, ज्याचा अनेक शेतकरी लाभ घेत आहेत तसेच घोराड गावात परिश्रम शेतकरी गट या १२ शेतकऱ्यांच्या समुहाने सेंद्रिय शेतीचा यशस्वी अवलंब केला असुन शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतबांधावर फार्म लॅब उभारण्यात आली आहे. या शिवाय सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा भाजीपाला, लोणचे, तुप, लाल मिरची पावडर, हळद, पांढरी हळद या सारखी शुद्ध व खात्रीशीर उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवली जात आहेत.

या उत्पादनांनी त्यांच्या चवीमुळे आणि गुणवत्तेमुळे ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे. सेंद्रिय माल दिसायला साधा असला तरी त्याची खरी ओळख त्याच्या चव आणि पौष्टिकतेतूनच होते. सेंद्रिय उत्पादनांचे दर कदाचित थोडे जास्त असले तरी आरोग्यदायी जीवन शैलीसाठी त्यांची गरज ओळखुन ग्राहकांकडुन त्याला चांगली मागणी मिळत आहे. विशेष म्हणजे या उपक्रमामुळे शेतीपासून दुर गेलेल्या तरुणांना शेतीकडे वळण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. हे शेतकरी गावोगावी जाऊन सेंद्रिय व नैसर्गिक शेतीबद्दल जनजागृती करत आहेत. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात. नैसर्गिक शेती मिशन व जैविक शेती मिशन अंतर्गतही ते कृषी विभागाच्या सहकार्याने सक्रियपणे काम करत आहेत.

# दूध भेसळखोरांना आता 'मोक्का': अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी विधानपरिषदेत केली घोषणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – दुधामध्ये भेसळ करून सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या विरुद्ध आता महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा म्हणजेच 'मोक्का' अंतर्गत कारवाई केली जाईल, अशी घोषणा अन्न व औषध प्रशासन (एफडीए) मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सोमवारी विधान परिषदेत केली. अन्नपदार्थांमधील भेसळीची प्रकरणे सरकारने अत्यंत गांभीर्याने घेतली असून दोषींवर कठोर कायदेशीर तरतुदी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान डॉ.मनीषा कायंदे आणि कृपाल तुमाने यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना झिरवाळ यांनी ही माहिती दिली. नुकत्याच अंधेरी परिसरात करण्यात आलेल्या कारवाईचा दाखला देत त्यांनी सांगितले की, एफडीए आणि पोलिसांच्या संयुक्त पथकांनी सात ठिकाणी छापे टाकून दूध भेसळीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे. तपास यंत्रणांना अधिक अधिकार देणार राज्यातील जनतेला शुद्ध आणि दर्जेदार दूध मिळावे यासाठी सरकार कटिबद्ध असून, यापुढे अशा गुन्ह्यांमध्ये सापडणाऱ्यांवर थेट संघटित गुन्हेगारीच्या कलमांनुसार गुन्हे दाखल केले जातील.

# जिल्ह्यात एल.पी.जी.गॅसचा मुबलक साठा : अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन तक्रारीसाठी तालुकानिहाय संपर्क क्रमांक जाहीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – मध्यपूर्व आशिया, अमेरिका व युरोपियन खंडात सध्या सुरू असलेल्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील इंधन पुरवठ्याबाबत खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात कार्यरत असलेल्या बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएल या तिन्ही कंपन्यांच्या एल.पी.जी. गॅस सिलेंडर वितरकांची बैठक घेऊन आढावा घेतला.

जिल्ह्यामध्ये एल.पी.जी. गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध असून नागरिकांना बुकिंगनंतर लवकरात लवकर 'फर्स्ट इन फस्ट आउट' ऑर्डरनुसार सिलेंडर उपलब्ध होईल. तसेच गॅस एजन्सीवर गर्दी होऊ नये, यासाठी टोकन सिस्टीम लागू करावी. तसेच बुकिंगनंतर ८ दिवसांचे आत ग्राहकाला सिलेंडर उपलब्ध होईल, असे नियोजन करण्याबाबत संबंधित यंत्रणेला सूचना करण्यात आल्या आहेत.

जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच ऑईल कंपन्या मिळून जिल्ह्यातील एल.पी.जी. गॅस सिलेंडर साठा पुरेसा उपलब्ध राहील याबाबत कटीबद्ध आहेत. त्यामुळे गॅस एजन्सीवर अनावश्यक गर्दी टाळावी तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. जिल्ह्यात पुरेसा साठा उपलब्ध असून त्याचा नियमित व सुरळीत पुरवठा करण्यात येईल.

सिलेंडरच्या वितरणात काही अडचणी उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ संबंधित तालुकानिहाय नियुक्त केलेल्या खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. यामध्ये जिल्हा हेल्पलाईन क्रमांक ७२१९१११४२४ असून, अमरावती शहरासाठी प्रविण राऊत (९६७३१६१९७५), मोर्शी तालुक्यासाठी सागर बगाडे (८६००८५६४३१), नांदगाव खंडेश्वर तालुक्यासाठी शीतल राठोड (९४२१८६९९९५), वरुड तालुक्यासाठी निखील नलावडे (९८२२५०८४०३), अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी रणजीत रामाघरे (९५११७१५१९२), तिवसा व अमरावती ग्रामीण तालुक्यासाठी शीतल आंबटकर (९०११३४१२८७), भातकुली तालुक्यासाठी मोनाली भोवरे (९५५२८७१५७२), धामणगाव रेल्वे तालुक्यासाठी प्रवीण भागवत (७०३८६०६३८५), अचलपूर तालुक्यासाठी राहुल केदारे (९६६५७४४८४९), चांदुर रेल्वे तालुक्यासाठी विश्वनाथ पखाले (९६७३५६१९६४), धारणी तालुक्यासाठी रमेश वाढवे (९४०३५३२१९०), चिखलदरा तालुक्यासाठी गणेश इंगळे (७५०७९५३५५५), दर्यापूर तालुक्यासाठी वैभव महाजन (९४०४२०७६०२) आणि चांदूर बाजार तालुक्यासाठी जितेंद्र पाटील (९३५६७४२५२८) यांची नेमणूक करण्यात आली आहे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी केले आहे.

# अडीच वर्षांच्या बालीकेवर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट

## सार्वजनिक आरोग्य विभागातील चौथी यशस्वी शस्त्रक्रिय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – विभागीय संदर्भ सेवा (सुपर स्पेशालिटी) रुग्णालयामध्ये २.५ वर्षांच्या बालिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागातील चौथी यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट सर्जरी ठरली असून, बालिकेला नव्या ऐकू येण्याच्या जगाची दारे खुली झाली आहेत. सदर रुग्ण ही अडीच वर्षांवरील असल्याने कुठल्याही योजने मध्ये बसत नसल्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी संपूर्ण निधी ची उपलब्धता अमरावती जिल्हा नियोजन समिती मार्फत केलेली आहे व शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी मध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पुढील एक वर्ष स्पीच थेरपी विनामूल्य करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रामधील पहिली कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया आहे जी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमधून शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी चा लाभ या योजनेतून रुग्णास देण्यात येणार आहे. दोन्ही योजनांच्या माध्यमातून शस्त्रक्रिया व स्पीच थेरपी याचा लाभ विनामूल्य रुग्णास मिळणार आहे.

सदर रुग्ण ही रा.ब्राह्मणवाडा थळी, ता.चांदूरबाजार, जि. अमरावती येथील रहिवाशी असून जन्मतः ती ऐकण्यास अक्षम होती. रुग्ण दोन वर्षाची झाल्यानंतर तिच्या कुटुंबियांना समजले की ती ऐकू शकत नाही. सुरुवातीला रुग्ण जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे ऑडियोलॉजिस्ट गोपाळ जयवाल यांच्याकडून तपासणी केल्यानंतर रुग्णास त सूपर स्पेशालिटी हॉस्पिटलला शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. सूपर स्पेशालिटी रुग्णालयात रुग्णाच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या व रुग्णास ऑडिओलॉजिस्ट लक्ष्मण मोरे यांच्याकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले व तदनंतर शेवटी दिनांक १६ मार्च २०२६ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर शस्त्रक्रिये मधे पारंपारिक तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान जसे स्मार्ट नेव नावाचे वायरलेस उपकरण वापरण्यात आले.

सदर जटिल शस्त्रक्रिया रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथील कान-नाक-घसा विभागप्रमुख डॉ.जीवन वेदी व सूपर स्पेशालिटी हॉस्पिटल चे विशेष कार्य अधिकारी तसेच इ.एन.टी सर्जन डॉ.मंगेश मेंढे , ऑडियोलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, बालरोग तज्ञ डॉ.नितीन बर्डिया, बधिरीकरण तज्ज्ञ डॉ.बाळकृष्ण बागवाले, डॉ.संजय महातपुरे, रेडिओलॉजिस्ट डॉ.शशांक दूरशिट्टीवार, यांच्या मार्फत करण्यात आली. सदर शस्त्रक्रिये मधे वैद्यकीय अधिकारी डॉ.उज्वला मोहोड, शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.पायल रोकडे, डॉ.दिव्यांनी मुंदाने, आकाश काळे, वेदांत इंदुरकर, ज्ञानेश लांजेवर, राहुल कवनपुरे यांचे शस्त्रक्रियेत विशेष सहकार्य होते.

# शहीद दिनानिमित्त विभागीय आयुक्तालयात शहीदांना अभिवादन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – शहीद दिनानिमित्त विभागीय आयुक्तालयात आज विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल यांनी भारताचे स्वातंत्र्य सेनानी शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी अपर आयुक्त सुरज वाघमारे, संजय जाधव, उपायुक्त रविंद्र हजारे, संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# शिवशक्ती क्रीडा मंडळ जामगाव तर्फे रक्तदान शिबिर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



रक्तदान शिबिरात ४५ तरुणांनी केले रक्तदान

**वरुड** – डॉ.चौधरी स्त्री रुग्णालय व वैष्णवी बाल रुग्णालय, समाज प्रबोधन मंच वरुड, शिवशक्ती क्रीडा मंडळ जामगाव (खडका) तसेच अखिल माकोडे मित्र परिवार यांच्या संयुक्त नियोजनात लाईफ लाईन ब्लड सेंटर नागपूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिरात ४५ तरुणांनी रक्तदान करत आपली सामाजिक भुमिका पार पाडली. एपीआय श्रीकांत विखे, पो.कॉ.किरण दहिवडे, सागर लेवरकर यांनी या शिबिराला सदिच्छा भेट दिली. क्रिडा क्षेत्रात सक्रिय असलेल्या या मंडळाने समाजसेवेचा आदर्श ठेवत हा उपक्रम राबवुन एक सकारात्मक संदेश दिला. मैदानी खेळांसोबतच सामाजिक व मानवीय दृष्टिकोन जपत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान हे सर्वोत्तम दान मानले जाते, या भावनेतुन अनेक युवक, ग्रामस्थ व क्रीडाप्रेमींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. शिबिरामध्ये रक्तदात्यांची तपासणी करुन सुरक्षित पद्धतीने रक्त संकलन करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजु रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होणार असुन समाजात रक्तदानाबाबत जागरुकता वाढविण्याचा हेतु साध्य झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंडळाचे पदाधिकारी, स्वयंसेवक व लाईफ लाईन ब्लड सेंटरच्या वैद्यकीय टीमने विशेष परिश्रम घेतले.

यावेळी शिवशक्ती क्रीडा मंडळ सदस्य तुषार घोंगडे, पंकज वानखडे, राहुल शिवारे, चेतन गावंडे, महेश घोंगडे, चंद्रशेखर काळमेघ, रुपेश शेंबेकर, मयुर गावंडे, रोशन वानखडे, परिक्षित वानखडे, विवेक कडु, उदय घोंगडे, कौशल घोंगडे, आदेश घोंगडे, प्रणय घोंगडे, शुभम घोंगडे, अंकुश वानखडे, लोकेश नेहारे, मोहित कोठे, तेजस गावंडे, अनिकेत घोंगडे, हर्षु गावंडे तसेच अखिल माकोडे तथा मित्रपरिवारातील अनिल माकोडे, देवेंद्र ठाकरे, अक्षय मगर्दे इत्यादी अनेक सदस्यांनी उपस्थित राहुन रक्तदान शिबिराचे यशस्वी नियोजन करुन रक्तदान केले व मॉर्निंग स्ट्रायकर क्रिकेट टीमच्या खेळाडुंनी रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान केले.

शिवशक्ती क्रीडा मंडळा तर्फे उपस्थितांचे आभार माणुन शिवशक्ती क्रीडा मंडळ जामगाव तर्फे भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# अमृत संस्थेमार्फत टंकलेखन व लघुलेखन परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

## ३० एप्रिलपर्यंत ऑनलाईन अर्जाचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स (GCC-TBC) आणि लघुलेखन परीक्षेचा निकाल १० मार्च २०२६ रोजी जाहीर झाला आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी 'अमृत' संस्थेने परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना सुरू केली असून, पात्र विद्यार्थ्यांनी ३० एप्रिल २०२६ पर्यंत आपले अर्ज ऑनलाईन सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे. या योजनेचा लाभ प्रामुख्याने अमृतच्या लक्षित गटातील (ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगूनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, हिंदू नेपाली, भूमिहार, लोहाणा, कानबी) यांसारख्या विविध समाजातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे. अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अमृत संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://mahaamrut.org.in/) भेट द्यावी. अर्जदारांकडे सन २०२५-२६ किंवा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र किंवा एथड प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. तसेच राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र , जातीचा उल्लेख असलेला शासकीय पुरावा (उदा. टी.सी., निर्गम उतारा), जानेवारी २०२६ चे उत्तीर्ण प्रमाणपत्र आणि बँक खात्याचा तपशील ही कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून विहित मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे कळिवण्यात आले आहे.

**नोकरी**

मिहान, ऑफिस, बँकींग, अर्धसरकारी प्रोजेक्ट साठी प्रत्येक जिल्हयात भरती. ऑपरेटर, सुपरवायजर, गार्ड, वर्कर, मॅनेजर

वय - १८ ते ३५

पगार - १५,००० ते ३५,००० कमवा

पुजा मॅडम ७७९६३८७१५६ ७८८८०६९४५५

**भाडयाने देणे आहे**

टिप-टॉप कलेक्शन हे दुकान भाडयाने देणे आहे. नगरपरिषद कॉम्प्लेक्स, केदार चौक, वरुड, ता.वरुड

खाली - वर जागा ६८० स्क्वे.फुट, भाग्यलक्ष्मी फर्निचरच्या बाजुला

संपर्क : महेबुबभाऊ मोबा.९४२१७३९४४७




# इराण युद्ध व तेल संकटावर मोदींनी ट्रम्पच्या विरोधात एक शब्दही उच्चारला नाही : गांधींची टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या तेल संकटावर आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक शब्दही काढला नाही अशी टीका लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. गुजरातमधील वडोदरा येथे आयोजित आदिवासी अधिकार संविधान परिषदेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.

लोकसभेत पश्चिम आशियात सुरू असलेल्या संकटावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषण दिलं. त्यावर राहुल गांधी यांनी टीका केली. देशात एवढं संकट निर्माण झालं असताना मोदींनी अमेरिकेच्या विरोधात एक शब्दही का काढला नाही असा प्रश्न राहुल गांधींनी विचारला. मोदींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह राहुल गांधी यांनी पश्चिम आशियामधील परिस्थितीवर बोलताना मोदी सरकारकडे स्पष्ट धोरण नसल्याचा आरोप केला. देशासमोर उभ्या असलेल्या आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय आव्हानांवर सरकारकडे ठोस दिशा नाही असं मत राहुल गांधी यांनी व्यक्त केलं. भारत-अमेरिका करारावर टीका भारत-अमेरिका व्यापार करारावरही राहुल गांधी यांनी प्रश्न उपस्थित केले. कृषी क्षेत्र प्रथमच अमेरिकेसाठी खुले केल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच मोदी सरकारने भारताचा मौल्यवान डेटा अमेरिकेला दिल्याची टीका त्यांनी केली.

# 'गिरगाव चौपाटीवरील जेट्टीचे काम तातडीने पूर्ण करणार'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** - मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीवरील सागरी सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी गिरगाव चौपाटी येथे उभारण्यात येणारे 'पोलीस बोट स्टेशन' (जेट्टी) अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

त्यामुळे हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाची आहे, अशी ग्वाही मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी विधानपरिषदेत दिली.

आमदार सुनील शिंदे यांनी गिरगाव चौपाटी येथील बोट स्टेशनच्या रखडलेल्या कामाबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. '२६/११ सारख्या दहशतवादी हल्लयांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि सागरी गस्त अधिक प्रभावी करण्यासाठी हे बोट स्टेशन महत्त्वाचे आहे.

सहा महिन्यांपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून यासाठी निधीची तरतूद करण्यात आली असूनही अद्याप हे काम सुरू का झाले नाही? ही जेट्टी नियोजित वेळेत पूर्ण होणार का?' असा सवाल शिंदे यांनी विचारला.

आमदार शिंदे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री नितेश राणे म्हणाले की, 'निधीची तरतूद सहा महिन्यांपूर्वी करण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात हा निधी यावर्षी जानेवारी महिन्यात प्राप्त झाला आहे. पोलीस दलासाठी ही जेट्टी अत्यंत महत्त्वाची आहे, मात्र सध्या या कामाची जी गती आहे, त्याबद्दल मी स्वतः समाधानी नाही. त्यामुळेच संबंधित अधिकाऱ्यांना हे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.'

# उन्हाळा वाढणार, पाऊसही पडणार : राज्यभर यलो अलर्टचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यातील हवामानातील चढउतार चालूच आहेत. गेले काही दिवस काही भागात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाल्यानंतर आता सर्वत्र उष्णतामान वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेषतः मुंबई व परिसरात येत्या दोन दिवसात उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील पाच दिवस राज्यभरात प्रचंड उकाडा आणि उन्हाचा कडाका जाणवणार आहे. तर मराठवाड्यात व मध्य महाराष्ट्रात काही भागात मुसळधार पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. भारतीय हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरीला चोवीस तास यलो अलर्ट जारी केला आहे. तर मराठवाडा विदर्भात काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे किनारपट्टीच्या भागात उष्णतेच्या लाटा आणि मराठवाडा विदर्भात अवकाळी पावसाचा इशारा आहे.

# कोलंबियात मोठी दुर्घटना, ११० जवानांना घेऊन जाणारं हवाई दलाचं विमान उड्डाण घेताच तीन किलोमीटरवर क्रॅश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***नवी दिल्ली*** – कोलंबियात हवाई दलाचं एक विमान दुर्घटनाग्रस्त होऊन कोसळलं आहे. या विमानातून ११० जवान प्रवास करत होते, अशी माहिती आहे. हवाई दलाचं विमान उड्डाण घेतल्यानंतर लगेचच कोसळल्याची माहिती आहे. ही दुर्घटना दक्षिण अमेझॉन क्षेत्रातील पेरुच्या सीमेजवळ प्यूर्टो लेगुइजामो भागात झाली.

स्थानिक वृत्तसंस्था ब्लू रेडिओनं म्हटलं की या विमानात ११० जवान होते. कोलंबियाच्या संरक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार सोमवारी देशाच्या दक्षिण भागात एक लॉकहीड मार्टिन हरक्यूलिस उ-१३० विमान दुर्घटनाग्रस्त झालं आहे.

संरक्षण मंत्र्यांनी दिली माहिती कोलंबियाचे संरक्षण मंत्री पेड्रो सांचेन यांनी म्हटलं की ही दुर्घटना विमान पेरुच्या सीमेजवळील कोलंबियाच्या दक्षिण अमेझॉन येथील प्यूर्टो लेगुइजामो येथून उड्डाण करत होतं. याविमानात सशस्त्र दलाचे जवान होते. ते म्हणाले की पीडितांची योग्य संख्या अजून समजली नाही, दुर्घटनेचे कारण देखील समोर आलेलं नाही. ब्लू रेडिओनं अधिकाऱ्यांच्या हवाल्यानं म्हटलं की या विमानात ११० जवान होते.

ही दुर्घटना एका शहरापासून ३ किलमीटर अंतरावर झाली. हा अपघात नेमका कशामुळं घडला हे समोर आलेलं नाही. मात्र, हे विमान जिथं कोसळलं तिथले व्हिडिओ समोर आले आहेत.

फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी बोलिवियात हवाई दलाचं आणखी एक हरक्युलिस सी- १३० विमान राजधानी ला पाज जवळ ऑल्टोमध्ये दुर्घटनाग्रस्त झालं होतं. या दुर्घटनेत २० जणांचा मृत्यू झाला होता. तर ३० जण जखमी झाले होते. त्या विमानातील पैसे शहरातील विविध भागात पडले होते त्यामुळं सुरक्षा दल आणि लोकांमध्ये संघर्ष झाला होता.

# नालेसफाई कंत्राटदारांची थकीत रक्कम देण्यास प्रशासन तयार, कंत्राटदार कामाला करणार सुरुवात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - मुंबई महापालिकेच्या वतीने छोट्या आणि मोठ्या नाल्यांच्या सफाईसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांची अडवणू ठेवलेली उर्वरित रक्कम देण्यास महापालिका प्रशासन तयार झाले आहे.

मागील पावसाळ्यात कंत्राटदारांनी केलेल्या कामाच्या तुलनेत ५० टक्के रक्कम अदा करण्यात आली होती, तर उर्वरित ५० टक्के रक्कम राखीव ठेवण्यात आली होती. ही उर्वरित रक्कम देण्यास महापालिका प्रशासनाने तयारी दर्शवली असल्याची माहिती मिळत आहे. मुंबईतील छोट्या आणि मोठ्या नाल्यांच्या सफाईसाठी महा पालिकेच्या वतीने २०२५ आणि २०२६ या दोन वर्षांसाठी कंत्राटदारांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे यावर्षी कंत्राटदार नियुक्त असल्याने १ मार्चपासून नालेसफाईच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणे अपेक्षित असतानाही, मागील वर्षाच्या थकबाकी रक्कम न मिळाल्याने कंत्राटदारांनी काम सुरू केले नव्हते. या पार्श्वभूमीवर महापालिका मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांचे उपायुक्त आणि प्रमुख अभियंते यांची बैठक पार पडली.

